
एकलव्य

# मी पण...

एक चित्रकथा



वी. सुतेयेव

# मी पण ...

चित्र आणि कथा
वी. सुतेयेव

एकलव्य चे प्रकाशन

**मी पण...**

एक चित्रकथा

**चित्र आणि कहानीः वी. सुतेयेव**

मराठी अनुवादः सुधा हर्डीकर

स्टोरीज़ एंड पिक्चर्सची एक चित्रकथा.
प्रगति प्रकाशन, मॉस्कोच्या सौजन्याने इंग्रजीतून अनुदित आणि प्रकाशित.

ही चित्रकथा मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार आणि
सर रतन टाटा ट्रस्टच्या वित्तीय सहयोगानी प्रकाशित.

संस्करणः जानेवारी 2002 / 3000 प्रति
पहिले पुनर्मुद्रणः जुलै 2015 / 2500 प्रति
दूसरे पुनर्मुद्रणः जानेवारी 2020 / 2000 प्रति
तिसरे पुनर्मुद्रणः जानेवारी 2022 / 2000 प्रति
चौथा पुनर्मुद्रणः ऑक्टोबर 2023 / 2000 प्रति
कागदः 100 gsm मेपलिथो व 220 gsm पेपर बोर्ड (कव्हर)
ISBN: 978-81-87171-94-2
मूल्यः ₹ 45.00

ही चित्रकथा हिन्दीमध्ये, आणि इंग्रज़ी उपलब्ध आहे.

प्रकाशकः **एकलव्य फाउंडेशन**
जमनालाल बजाज परिसर
फॉर्च्यून कस्तूरी जवक, जाटखेड़ी,
भोपाळ - 462 026 (मप्र)
फोनः +91 755 - 297 7770, 71, 72
www.eklavya.in / books@eklavya.in

मुद्रकः बॉक्स कॉरोगेटर्स एंड ऑफसेट प्रिंटर्स, भोपाल, फोन +91 755 258 7551




# मी पण...




एका अंड्यातून बदकाचं पिल्लू निघालं.
“पहा मी अंड्यातून बाहेर आलो.” बदकाचं पिल्लू म्हणालं.



दुसऱ्या अंड्यातून कोंबडीचं पिल्लू बाहेर निघालं.
“मी पण बाहेर आलो.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“मी फिरायला जातो आहे.” बदकाचं पिल्लू म्हणालं.
“मी पण येतो.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“मी खड्डा खोदतो आहे.” बदकाचं पिल्लू म्हणालं.
“मी पण खोदेन.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“हे पहा मला गांडूळ मिळालं.” बदकाचं पिल्लू म्हणालं.
“मला पण मिळालं.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“पहा मी फूलपाखरु पकडलं.” बदकाचं पिल्लू म्हणालं.
“मी पण फूलपाखरु पकडलं.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“मी तलावात पोहायला जातो आहे.” बदकाचं पिल्लू म्हणालं.
“मी पण येतो.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.




“पहा मी कसा पोहतो आहे.” बदकाचं पिल्लू म्हणालं.




“मी पण पोहणार आहे.” कोंबडीचं पिल्लू म्हणालं.



“वाचवा.. वाचवा...,” कोंबडीचं पिल्लू ओरडलं.



बदकाच्या पिल्लाने कोंबडीच्या पिल्लाला पाण्यातून बाहेर काढलं.



"मी पुन्हा पोहायला जाणार आहे." बदकाचं पिल्लू म्हणालं.

"नको रे बाबा . . . मी नाही जाणार पाण्यात." कोंबडीचं पिल्लू म्हणालं.

एकलव्य चे प्रकाशन

मूल्य: ₹ **45.00**

9 788187 171942